# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

मध्यवर्ती कार्यालय :
शिवाजी नगर, गंगापूर रोड,
नाशिक – ४२२ ००२.
फोन : (०२५३) २५७४५११, २५७३४२२
फॅक्स : (०२५३) २५७९८६३

# MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ, NASHIK

**CENTRAL OFFICE :** Shivaji Nagar,
Gangapur Road, Nashik - 422 002.
Tel. : (0253) 2574511, 2573422
Fax : (0253) 2579863
E-mail : ndmvpsamajnashik@yahoo.co.in
Website : www.mvp.edu.in


**परिपत्रक क्र** 2283 **/२०२३-२४** **दिनांक :- ०६/०६/२०२३**

**प्रति,**

प्राचार्य/मुख्याध्यापक,

मराठा विद्या प्रसारक समाज संचलित **सर्व मराठी माध्यमांचे प्राथमिक /माध्यमिक/उच्च माध्यमिक व अव्यावसायिक वरिष्ठ महाविद्यालये यांसी** –

## विद्यार्थी मेडिक्लेम पॉलिसी

आपल्या संस्थेतील शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता सामूहिक मेडिक्लेम व वैयक्तिक अपघाती विमा पॉलिसी सन-**२०२३-२४** करीता आहे. सदर पॉलिसी **दि. ०१ जुलै २०२३** पासून पुढील एक वर्षाकरिता असणार आहे.

विद्यार्थी हा एकमेव सदस्य या मेडिक्लेम पॉलिसी योजनेत समाविष्ट आहे. विद्यार्थ्याला दरवर्षी **रु.१६५/-** वार्षिक हप्ता भरावयाचा आहे. सदर पॉलिसी योजनेचे फायदे खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | **विम्याचा वार्षिक हप्ता** | **१६५/-** |
| २ | **विमा पॉलिसीची मुदत १ वर्ष** | |
| ३ | मेडिक्लेम विमा पॉलिसी योजने अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी हॉस्पिटलायझेशन खर्चासाठी मिळणारी रक्कम | **५०,०००/-** |
| ४ | अपघाती विमा योजने अंतर्गत वडिलांच्या अपघाती मृत्यूनंतर विद्यार्थ्यास मिळणारी रक्कम | **२,००,०००/-** |
| ५ | अपघाती विमा योजने अंतर्गत आईच्या अपघाती मृत्यूनंतर विद्यार्थ्यास मिळणारी रक्कम | **१,००,०००/-** |
| ६ | अपघाती विमा योजने अंतर्गत विद्यार्थ्याच्या अपघाती मृत्यूनंतर पालकास मिळणारी रक्कम | **१,००,०००/-** |

1) ज्या विद्यार्थ्यांना ह्या पॉलिसी योजनेत सहभागी व्हायचे असेल अशा विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी **वार्षिक हप्त्याची रक्कम रु. १६५/-** जमा करण्यात यावी.
2) ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना **वार्षिक हप्त्याची रक्कम रु. १६५/-** जमा केलेली नसेल अशा विद्यार्थांना विद्यार्थी विमा पॉलिसी योजनेची माहिती देऊन इच्छुक विद्यार्थांकडून **दिनांक १७ जून २०२३** पर्यंतच रक्कम जमा करण्यात यावी.
3) विमा रक्कम जमा करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या नमूना फॉर्म **(Excel Sheet)** मध्ये भरून घेणे आवश्यक आहे.
4) सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती विहित नमुन्यात भरून Excel Sheet ची Soft Copy (mediclaim@mvp.edu.in) **व** (mvp.suvarnainsurance@gmail.com) या **(दोनही)** मेलवरती **दिनांक २० जून २०२३** पर्यंतच पाठविण्यात यावी.
5) **दिनांक २१ जून २०२३** पर्यंत विहित नमुन्यात पाठविलेली माहिती विमा कंपनीकडून तपासण्यात येईल, माहिती योग्य असल्यास विमा कंपनीकडून त्याबाबतचा QR CODE संबंधित शाखेस इमेल द्वारे कळविण्यात येईल.

**विमा कंपनीकडून QR CODE प्राप्त झाल्यानंतर,**

1. विद्यार्थी विमा रक्कमेचा चेक **'सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज'** या नावाने तयार करून किंवा रोख रक्कम,

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक
मध्यवर्ती कार्यालय :
शिवाजी नगर, गंगापूर रोड,
नाशिक – ४२२ ००२.
फोन : (०२५३) २५७४५११, २५७३४२२
फॅक्स : (०२५३) २५७९८६३

MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ, NASHIK
CENTRAL OFFICE : Shivaji Nagar, Gangapur Road, Nashik - 422 002.
Tel. : (0253) 2574511, 2573422
Fax : (0253) 2579863
E-mail : ndmvpsamajnashik@yahoo.co.in
Website : www.mvp.edu.in

2. सोबत विमा कंपनीकडून प्राप्त झालेला QR CODE व
3. विद्यार्थ्यांच्या नावाची पूर्ण यादी

**दिनांक २० जून २०२३ पासून ते दिनांक २८ जून २०२३ पर्यंतच** मध्यवर्ती कार्यालयातील ऑडिट विभागात **जबाबदार व्यक्तीने प्रत्यक्ष** जमा करावी.मुदती नंतर आलेले चेक किंवा रोख रक्कम व यादी स्विकारली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी. विद्यार्थ्यांकडून ठरवून दिलेल्या मुदतीनंतर विमा रक्कम स्विकारल्यास अथवा ठरवून दिलेल्या मुदतीत विमा रक्कम मध्यवर्ती कार्यालयात जमा न केल्यास, विमा रक्कम जमा केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नुकसान भरपाई देण्याची **वैयक्तिक जबाबदारी शाखा प्रमुख** यांची राहील.

**महत्वाची सूचना:-**

1) सदर पॉलिसी सक्तीची नसून ऐच्छिक आहे. ज्या विद्यार्थ्यांना ह्या पॉलिसीचा लाभ घ्यावयाचा आहे अशाच विद्यार्थ्यांची माहिती विमा कंपनी व मध्यवर्ती कार्यालयात पाठवावी.
2) विद्यार्थी मेडिक्लेमची रक्कम भरण्या अगोदर विद्यार्थ्यांची यादी मेडिक्लेम ऑफिसला ई-मेल द्वारे कळवून, त्यासर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कोड (QR Code) तयार करवून घेणे बंधनकारक राहील. विद्यार्थी कोड (QR Code) तयार करतांना कुठलीही अडचण असल्यास **मो.नं. ९८५०८९३५९४/ ०२५३-२५७२२९४** यावर फोन करावा.
3) विद्यार्थी कोड मेडिक्लेम ऑफिस कडून आल्यानंतरच रक्कम मध्यवर्ती कार्यालयात स्विकारली जाईल. सदर रक्कम भरण्यासाठी ऑडीट विभागात स्वतंत्र चलन तयार केले जाणार असून चलनावर सदर कोड नोंदविण्यात येणार आहे. तरी रक्कम भरण्या अगोदर (student QR code) मिळविणे अनिवार्य आहे.
4) **कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थी मेडिक्लेमची रक्कम बँक खात्यात परस्पर भरणा करू नये**, तसेच विमा रक्कमेचा चेक मध्यवर्ती कार्यालयातील इतर कुठल्याही विभागात/ व्यक्तीकडे जमा करू नये. बँक खात्यात परस्पर रक्कम भरल्यास अथवा इतर विभागात/व्यक्तीकडे चेक जमा केल्यास, शाखेतील संबंधित व्यक्ती त्या सर्व विधार्थ्यांची मेडिक्लेम रक्कम व नुकसान भरपाई देण्यास स्वतः जबाबदार राहील.

**( ॲड. नितीन बाबुराव ठाकरे )**
**सरचिटणीस,**
**मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक**